# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४१०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१४/०७/२०१६.

**१) मोटार सायकलच्या धडकेत इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २५/०६/२०१६ रोजी २१.३० ते २२.०० वा. दर. फिर्यादि गौरानी अरविंद ताम्रकार वय २८ वर्ष, रा. राधाकृष्ण वार्ड भंडारा याचे वडिल शिवगोपाल राधेश्याम नरवरीया ताम्रकार वय ५५ वर्ष, रा. भंडारा हे पायी रोड क्रॉस करीत असतांना आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६/८२८० च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादिच्या वडिलाला बावणकर पॅथालॉजी मेन रोड भंडारा येथे धडक मारून गंभिर जखमी केले. त्यांना उपचारा करीता मेडिकल कॉलेज नागपुर येथे भरती केले होते. दि. ०२/०७/०१६ रोजी उपचारा दरम्यान ते मरण पावले. असे फिर्यादिचे तोंडी व पो.स्टे. अजनी नागपुर येथील मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाटसे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :—**

दिनांक १३/०७/२०१६ रोजी १९.३० ते १९.५५ वा. दर. आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ४० डी १६३० च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत कारधा टि पॉईंट येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादि पोहवा. हटवार वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहे.

**३) इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक १३/०७/०१६ रोजी १५.३० वा. दर. फिर्यादी बाबुलाल गडीराम सपाटे वय ४५ वर्ष, रा. गोपेवाडा यांचा आनंदरावा उर्फ शक्ती महादेव सपाटे वय ४० वर्ष, रा. गोपेवाडा हा पुतन्या भाऊ आहे व तो मनोरूग्ण होता. मनोरूग्ण अवस्थेत दि. १०.०७.०१६ रोजी तो घरी कोणाला काही न सांगता घरून निघुन गेला होता. यासंबधी पो.स्टे. जवाहरनगर येथे गुमची रिपोर्ट देण्यात आली होती. दि. १३.०७.०१६ रोजी त्याचे प्रेत मारूती वैरागडे रा. मोहदुरा यांच्या शेतातील तलावाच्या पाण्यात मिळुन आले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोउपनि. लाखडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान मृत्यु. :—**

दिनांक १३/०७/०१६ रोजी १७.४५ वा. दर. अमित विलास भेंडारकर वय २४ वर्ष, रा. लावडी याने पागलपनाच्या भरात विषारी औषध प्राशन केले. तो उपचारा दरम्यान मरण पावला. असे फिर्यादि विलास रामजी भेंडारकर वय ४९ वर्ष, रा. लावडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. राऊत पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक १३/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०१ केसस, तिन सिटर वाहनांवरती १५ केसेस व इतर वाहनांवरती १०६ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.